पुलवामात चकमक तीन दहशतवादी ठार

■ श्रीनगर

जम्मू- काश्मीरच्या पुलवामामध्ये दहशतवादी आणि भारतीय जवानांमध्ये झालेल्या चकमकीत ३ दहशतवादी ठार झाले आहेत. पुलवामा जिल्ह्यातील त्रालमध्ये दहशतवादी लपल्याची माहिती भारतीय लष्कराला मिळाली होती. शोध मोहीम सुरू असतांना दहशतवाद्यांनी अचानक गोळीबार केला. त्याला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. त्यावेळी ३ दहशतवादी मारले गेले.

राष्ट्रीय रायफल्स, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जम्मू-काश्मीर पोलीस यांनी संयुक्तपणे कारवाई केली. चकमकीनंतर त्रालमध्ये जाणारे सर्व मार्ग बंद केले आहेत.

इंग्लंडचे बजेट ११ मार्चला ऋषी सुनक सादर करणार

■ लंडन

भारतीय वंशाचे ब्रिटनचे नवीन तरुण तडफदार अर्थमंत्री ऋषी सुनक हे या वर्षीचे इंग्लंडचे बजेट सादर करणार आहेत. ११ मार्चला ऋषी सुनक बजेट सादर करतील. मागच्या आठवड्यात साजिद जावेद यांनी राजीनामा दिल्यानंतर सुनक यांनी अर्थमंत्रिपदी विराजमान झाले. त्यानंतर वेळ कमी असल्यामुळे अर्थसंकल्पाला उशीर होईल अशी चर्चा होती. मात्र सुनक यांनी ट्विट करून सरकार अर्थसंकल्पाची तारीख बदलणार नसल्याचे सांगितले. ही माहिती दिली. मतदानापूर्वी मतदारांना दिलेला शब्द पूर्ण करण्याकडे या अर्थसंकल्पाचा कल असेल. या वर्षीचा अर्थसंकल्प इंग्लंडच्या प्रगतीवर आधारीत असेल. आता नवीन पंतप्रधान आणि अर्थमंत्री यांच्याशी सल्लामसलत करण्यासाठी आर्थिक सल्लागारांची टीम नेमण्यात आली आहे. यापूर्वी ऋषी सुनक इंग्लंडच्या ट्रेजरीचे सचिव होते. पहिल्यापासून ब्रेक्झिट मुद्यावरून ऋषी सुनक हे पंतप्रधान बोरिस जॉन्सनचे समर्थक होते. ब्रिटनमध्ये जन्मलेले ऋषी हे रिचमंडमधून दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आले.

ट्रम्प मोदी भेटीत व्यापारी कराराची शक्यता नाही

■ नवी दिल्ली

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत भेटीची भारताप्रमाणेच संपूर्ण जगाला उत्सुकता लागली आहे. गुजरातमध्ये ट्रम्प यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरु आहे. आंतरराष्ट्रीय माध्यमांनी जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाहीमधील वाढत्या मैत्रीवर लक्ष केंद्रित केले आहे. या भेटीत मोदी-ट्रम्प यांच्यात कोणताही व्यापारी करार होण्याची शक्यता कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तसेच जम्मू-काश्मीर हा भारताचा अंतर्गत प्रश्न असल्याचे भारताने संपूर्ण जगाला तसेच अमेरिकेला ठणकावून सांगितल्यामुळे या विषयावर देखील चर्चा होण्याची शक्यता कमी आहे. तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नियोजित भारत दौऱ्याआधी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. भारताकडून आम्हाला चांगली वागणूक मिळालेली नाही' असे ट्रम्प अँड्रूयूज येथील तळावर पत्रकारांशी बोलताना म्हणाले. तसेच कुक्कुटपालन, डेअरी उत्पादनांना भारतीय बाजारपेठेत जास्तीत जास्त प्रवेश मिळावा तसेच अन्य उत्पादनांवरील टॅक्स कमी व्हावा यासंबंधी ट्रम्प यांच्या भारत दौऱ्यात करार व्हावा यासाठी अमेरिकेकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

ब्रिटनच्या पंतप्रधानांचा घटस्फोट

■ ब्रिटन

ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन आणि पत्नी मरिना व्हीलर यांचा लवकरच घटस्फोट होण्याची शक्यता आहे. काल कौटुंबिक कोर्टाच्या न्यायाधीशांनी



आर्थिक समझोता करण्यास मान्यता दिली आणि व्हीलरला घटस्फोटाच्या निर्णयासाठी अर्ज करण्याची परवानगी दिली. त्यामुळे त्यांचा विवाह लवकरच संपुष्टात येण्याची शक्यता आहे.

लंडनमधील केंद्रीय कौटुंबिक न्यायालयात १० मिनिटांच्या खासगी सुनावणीला जॉन्सन किंवा व्हीलर हे दोघेही उपस्थित नव्हते. मात्र त्यांचे वकील उपस्थित होते. आधुनिक काळात जॉन्सन हे पदावर असतांना घटस्फोट घेणारे पहिले पंतप्रधान असल्याचे मानले जाते. न्यायाधीश सारा गिबन्स यांनी ही सुनावणी केली. त्यांना चार मुले आहेत. जॉन्सन यांचे १९९३ मध्ये लग्न झाले. त्यानंतर २०१८ मध्ये विभक्त झाले. ५५ वर्षांचा जॉन्सन गेल्या वर्षीपासून ३१ वर्षीय कॅरी सायमंड्सला डेट करीत आहे आणि हे जोडपे डाऊनिंग स्ट्रीटमध्ये एकत्र राहतात. जॉन्सन आणि व्हीलर यांनी जाहीर केले की ते सप्टेंबर २०१८ मध्ये विभक्त झाले आहेत आणि घटस्फोटाच्या प्रक्रियेतून जात आहेत. मंगळवारी झालेल्या सुनावणीत व्हीलरचे प्रतिनिधित्व लुसी स्टोन क्युसीने केले. जॉन्सनचे प्रतिनिधित्व सॉलिसिटर नील रसेल यांनी केले.

हिमाचल प्रदेशमधील जंगलाला भीषण आग

■ शिमला

हिमाचल प्रदेशच्या किन्नौर जिल्ह्यातील चौरा परिसरातील जंगलाला आज सकाळी भीषण आग लागली आहे. स्थानिक नागरिकांनी गवत जाळल्याने हा वणवा पेटल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही भागातील आग अटोक्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून आशा प्रकारे किन्नौरच्या जंगलात आगी लागल्याच्या अनेक वेळा घटना घडल्या आहेत. गेल्यावर्षी अशाच प्रकारचे दोन मोठे वणवे लागले होते. जंगल जाळल्यामुळे गवत चांगले येते. या समजुतीने स्थानिक नागरिक सुकलेल्या जंगलांना आग लावतात. मात्र आशा प्रकारे वारंवार लागलेल्या वणव्यांमुळे अनेक प्राणी-वनस्पती नष्ट होतात. वनविभाग या बाबत नागरिकांचे प्रबोधन करत आहे.

नवी मुंबई मनपात सत्ताधारी-विरोधकांत खडाजंगी

कुलकर्णी गटाच्या नगरसेविकेचा प्रस्ताव भाजपाने रोखला

■ नवी मुंबई

नवी मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत कालही निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खडाजंगी पाहण्यास मिळाली. अर्थसंकल्प स्थायीत सादर केल्यावर स्थायी समिती सुरू झाली. यात तुर्भे येथील बोनसरी नाल्याला संरक्षक भिंत बांधण्याचा साडेचार कोटींचा प्रस्ताव नवी मुंबई महापालिकेच्या स्थायीत आला होता. मात्र या प्रभागातील भाजपाचे नगरसेवक सुरेश कुलकर्णी हे नुकतेच आपल्या तीन नगरसेवकांसह राजीनामा देऊन शिवसेनेत दाखल झाले आहेत. याचा राग मनात धरून सत्ताधारी भाजपाने हा प्रस्ताव कोणतेही कारण न देता नामंजुर ठेवला. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधाऱ्यांत चांगलीच आरोपांची फैरी झडली. तसेच प्रस्ताव फाडून सभापती नवीन गवते यांच्या अंगावर भिरकावला.

तुर्भेतील बोनसरी नाला हा संरक्षक भिंत नसल्याने धोकादायक बनला आहे. नाल्याची न होणाऱ्या साफसफाईमुळे पावसात नाला काठोकाठ भरून वाहतो. यंदाच्या पावसाळ्यात तर नाल्याचे पाणी बाहेर आल्याने नाल्याशेजारील १५ घरांत पाणी भरले होते. तर अनेक घरांचे छत कोसळले होते. त्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या भागाचा तात्कालीन आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांनी दौरा केला होता. या भागातील गांभीर्य ओळखून तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. तर नगरसेवक सुरेश कुलकर्णी व नगरसेविका राधा कुलकर्णी यांच्याकडून देखील याबाबत सतत पाठपुरावा करण्यात येत होता. मुख्य म्हणजे या नाल्याबाबत घडलेल्या प्रकाराबाबत स्थायी समितीत पडसाद उमटले होते. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्याआधी नाल्याच्या संरक्षक भिंत बांधण्यासाठीचा प्रस्ताव नवी मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत आला होता. नागरिकांच्या दृष्टीने हिताचे निर्णय घेत असल्याचे मार्केटिंग करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी या भागातील राजकारण आड आणत हा प्रस्ताव नामंजुर ठेवला. त्यामुळे विरोधी पक्षात असलेली शिवसेना आक्रमक झाली. नगरसेवक रंगनाथ औटी व नगरसेविका सरोज पाटील यांनी सभापतींना जाब विचारला. मात्र भाजपाचे स्थायी समिती सभापती बहुमताच्या जोरावर हा प्रस्ताव नामंजुर ठेवून संपूर्ण शहराचे नाला व्हिजन आणण्याचे आदेश प्रशासनाला दिले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या या भूमिकेमुळे नागरिकांना यंदाचा पावसाळा जीव मुठीत घेऊन काढावा लागणार आहे.

- **पक्षांतराचा काढला राग**
- **शिवसेनेचा सत्ताधाऱ्यांवर जोरदार प्रहार**

विविध मागण्यांसाठी कोळी बांधव आक्रमक

■ मुंबई

शहरातील कोळीवाड्यांच्या विकासयोजनांबाबत सरकारी पातळीवरून हालचाली होत नसल्याने कोळी बांधव आता आक्रमक झाले आहेत. सर्व कोळीवाड्यांतून जनजागृती मोहीम राबवून सरकारवर दबाव टाकण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले आहेत. कोळीवाड्यांचे विस्तारित सिमांकन, सीझेड एमपी प्लॅन नकाशात कोळीवाड्यांचा समावेश करणे यासाठी कोळी बांधवांनी पाठपुरावा सुरू केला आहे. युती सरकारच्या काळात मुंबईतील सर्व कोळीवाड्यांचे सरकारने विस्तारित सिमांकन केले आहे. त्यादरम्यान मत्स्य विभाग आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे कोळीवाड्यांतील मोजणीचे काम केले. मात्र अद्याप त्याचे काम आणि याबाबत कोळी बांधवांना समजले नाही. त्यामुळे मुंबईतील भाटी कोळीवाडा, मढ कोळीवाडा, पातवाडी कोळीवाडा, एरंगळ सायन, गोराई, मालवणी, वंजिरा, चारकोप कांदिवली, खार-दांडा, वर्सोवा, मनोरी, माहीम, सायन, चेंदणी आदी कोळीवाड्यांतील कोळी बांधवांनी सभा घेत जनजागृती सुरू केली आहे. कोळीवाडा गावठाण विस्तार कृती समितीच्या माध्यमातून कोळी बांधव सरकारला साकडे घालणार आहेत.

दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवालांनी घेतली अमित शहांची भेट

■ नवी दिल्ली

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी बुधवारी दुपारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची त्यांच्या कृष्णा मेनन मार्गावरील निवासस्थानी भेट घेतली. खूप चांगली आणि सकारात्मक चर्चा झाली आणि दिल्लीशी संबंधित विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली.

दिल्लीच्या विकासासाठी एकत्र काम करण्यावर आमचे एकमत झाले असल्याचे अरविंद केजरीवाल यांनी या भेटीनंतर केलेल्या ट्विटवरुन सांगितले. दिल्ली निवडणुकीच्याआधी ढासळत्या कायदा-सुव्यवस्थेवर चर्चा करण्यासाठी अरविंद केजरीवाल यांनी अमित शहा यांच्या भेटीची वेळ मागितली होती. शहा यांच्या कार्यालयाने त्यावेळी भेटीची वेळ नाकारली होती.

वालधुनी नदीवर चक्क भगव्या रंगाचा तवंग

■ अंबरनाथ

अंबरनाथमध्ये वालधुनी नदीवर चक्क भगव्या रंगाचा तवंग पसरला आहे. अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसी येथे उगम पावणारी वालधुनी नदी पुढे वाहत शहरात येते. मात्र एमआयजीसीमध्ये या नदीत अनेक कंपन्यामधून प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी थेट सोडले जाते. त्यामुळे वालधुनी नदीवर चक्क भगव्या रंगाचा तवंग पसरला आहे. यावरुन वालधुनी नदी पूर्णपणे नासली असल्याचे समोर येत आहे. या नदीचे रासायनिक नाल्यात रुपांतर झाले असून याकडे एमआयडीसी, एनपीसीबी, किंवा पर्यावरण विभागातील कोणाचेही लक्ष नाही.

अयोध्येत मशीदीसाठीही ट्रस्ट निर्माण करा-शरद पवार

लखनऊ- अयोध्येत भव्य राम मंदिर उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून जशी ट्रस्ट निर्माण करण्यात आली आहे तशी मुस्लिम बांधवांच्या मशीदीसाठीही ट्रस्ट निर्माण करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी मोदी सरकारकडे केली आहे. याचबरोबर देश सर्वांचा आहे, सर्वांसाठी आहे, असेही पवार यांनी म्हटले आहे. उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, तुम्ही जसे राम मंदिराच्या उभारणीसाठी ट्रस्टची स्थापना करू शकता, मग मशिदीच्या उभारणीसाठी ट्रस्ट का निर्माण करू शकत? हा देश सर्वांचा आहे, सर्वांसाठी आहे. पवार पुढे म्हणाले की, येथील सरकार फक्त लोकांमध्ये धार्मिक तेढ निर्माण करण्याचे काम करत आहे. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेश सरकारच्या अर्थसंकल्पावरही टिका केली. या सरकारच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी काहीच नसल्याचे ते म्हणाले.

दापोली अर्बन बँकेवर सायबर हल्ला

सिस्टीममध्ये प्रवेश करून फसविण्याचा हॅकरचा प्रयत्न

■ रत्नागिरी, प्रतिनिधी

दापोली अर्बन बँकेच्या सिस्टीममध्ये अनधिकृत प्रवेश करून बँकेला फसविण्याचा अज्ञात हॅकरचा प्रयत्न फसला आहे. या अज्ञात हॅकरने बँकेला ४८ लाख रुपयांना फसविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र बँकेची फायर वॉल सिस्टीम मजबूत असल्याने व सुट्टीच्या दिवशी एनइएफटी सुविधा बंद असल्याने हॅकरचा हा प्रयत्न फसला. या घटनेची तक्रार दापोली पोलीस ठाण्यात देण्यात आली असून दापोली पोलिसांनी या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ४३ अ व ६६ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

दापोली अर्बन बँकेच्या संगणकीय सिस्टीममध्ये शनिवारी रात्री व रविवारी अज्ञात इसमाने प्रवेश करून बँकेच्या खेर्डी (ता.चिपळूण) शाखेतील बंद असलेले चालू खाते पुनर्जीवित करून या खात्याच्या नोंदीत ३ कोटी रुपये जमा दाखविले, यानंतर या खातेदाराच्या खात्यात एक मोबाईल क्रमांक अॅड करून या मोबाईल क्रमांकाचा वापर करून बँकेचे मोबाईलची सुविधा त्याने स्वतःच जनरेट करून त्यानंतर देशातील विविध बँकाच्या शाखांत एनइएफटीची २४ ट्रान्झक्शन करून या सुरू केलेल्या खात्यातून सुमारे ४७ लाख ९३ हजार रुपयांची रक्कम वर्ग करण्याचा प्रयत्न केला. यात अज्ञाताने एका दिवशी एका खातेदाराला एनइएफटी करण्याची लिमिट ५ लाख रुपये असताना हे लिमिटही क्रॅक केले. सोमवारी बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक (आयटी) शिरीष घाणेकर यांच्या लक्षात हा प्रकार आल्यावर मोबाईल बँकिंग सुविधा व एटीएम सुविधा तत्काळ बंद करण्यात आली असून या सायबर हल्ल्यात बँकेचे एक रुपयाचेही नुकसान झालेले नसल्याचे बँकेचे चेअरमन जयवंत जालगावकर यांनी सांगितले.

हडसर किल्ल्यावरून पडून ठाण्यातील तरुणीचा मृत्यू

जुन्नर, प्रतिनिधी - शिवजयंती साजरी करण्यासाठी जुन्नरजवळील हडसर किल्ल्यावर गेलेल्या ठाण्यातील तरुणीचा पाय घसरून पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी ११.३० ते १२ च्या सुमारास घडली. सिद्धी कामठे (२०) असे या मृत तरुणीचे नाव आहे. ठाण्यातील तरुण-तरुणी शिवजयंती साजरी करण्यासाठी जुन्नरजवळ असलेल्या हडसर किल्ल्यावर आल्या होत्या. त्यांच्यासोबत ठाण्यातील सिद्धी कामठे देखील होती. सकाळी ११.३० ते १२ च्या सुमारास हडसर येथे कुटीची वाट येथे सिद्धीचा पाय घसरला आणि ती साडेचारशे फूट खोल दरीत पडली. या घटनेची माहिती मिळताच जुन्नर पोलीस घटनास्थळी पोहोचले. स्थानिक पोलीस पाटील आणि ग्रामस्थांच्या मदतीने तिला दरीतून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर जुन्नर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

राम मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी नृत्य गोपाल दास

नवी दिल्ली - श्री राम मंदिर निर्मितासाठी स्थापन करण्यात आलेल्या श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टची पहिली बैठक आज पार पडली. या बैठकीत नृत्य गोपाल दास यांची श्रीराम मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर विश्व हिंदू परिषदेच्या चंपत राय यांची महासचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. स्वामी गोविंद देव गिरीजी यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राम मंदिर निर्मितीसाठी समितीही गठन करण्यात आली आहे. नृपेंद्र मिश्रा या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. या समितीच्या अहवालानंतर राम मंदिर निर्मितीची तारीख निश्चित केली जाणार आहे. चंतप राय यांनी याबाबत सांगितले की, अयोध्येतील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत श्रीराम ट्रस्टचे खाते खोलले जाणार आहे, असा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिका
अभियांत्रिक विभाग
फेर निविदा सुचना क्र. नमुंमपा/श.अ/514/2019-2020
कामाचे नांव :- दिघा विभागामध्ये ओ एस 1 या भुखंडावर उच्चस्तरीय व भुस्तरीय जलकुंभ बांधणे
अंदाजपत्रकिय रक्कम रु. 12,41,63,126/-
या फेरनिविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in व www.nmmc.maharashtra.etenders.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.
सही /-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका
जाक-नमुंमपा/जसं/जाहिरात/1512/2020

सिडको शहरांचे शिल्पकार
शुद्धिपत्रक क्र. १ (१ ला विस्तार)
सिडकोने दि. १४.०१.२०२० रोजी त्यांच्या अग्निशमन विभागाकरिता दोन (०२) टोइंग वाहनांच्या रचनेकरिता निविदा सूचना (ई- निविदा क्र. ३२५९) प्रसिद्ध केली होती. सदर निविदांकरिता पंधरा दिवसांचा (१५ दिवस) १ ला विस्तार देण्यात येत आहे. सुधारित बोली वेळापत्रक वेबसाइट **cidco.maharashtra.etenders.in** वर उपलब्ध आहे.
मुख्य अग्निशमन अधिकारी
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.
(मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक)
मध्यवर्ती कार्यालय : 'मारुतागिरी', प्लॉट क्र. १३/९ ए, सामंत इस्टेट, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३. दूर. : ६१८९ ००००.
ई-मेल : du@bharatbank.co.in वेबसाइट : bharatbank.com
बँकेच्या सर्व ग्राहकांना जाहीर सूचना
नो युवर कस्टमर/रि-केवायसी संदर्भातील आरबीआय मार्गदर्शक सूचनांच्या अनुपालनांतर्गत सदर जाहीर सूचनेच्या माध्यमातून बँकेच्या ग्राहकांना विनंती करण्यात येत आहे की, नजीकच्या भूतकाळात त्यांनी संबंधित दस्तावेज सादर केलेले नसल्यास त्वरित भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.च्या संबंधित शाखेमध्ये केवायसी व पॅन/फॉर्म ६० दस्तावेज सादर करावेत.
ग्राहकांनी त्यांच्या शाखेमध्ये कृपया खालील केवायसी दस्तावेज/अधिकृत वैध दस्तावेज (ओव्हीडी) सादर करावेत :
१. ओळखीचा पुरावा (फोटो ओळखपत्र) व मोबाइल क्रमांक
२. खातेधारकाच्या अलीकडील पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रासहित नवीनतम निवासी पत्त्याचा पुरावा.
३. चालू खातेधारकाचे नवीनतम/वैध व्यावसाय/व्यावसायिक परवाने/परवानग्या यांची प्रत
४. अनिवासी भारतीय खातेधारकांनी व्हिसा तपशिलासमवेत वैध पासपोर्टची साक्षांकित प्रत सादर करावी.
५. ज्या एनआरआय ग्राहकांनी त्यांचे खाते उघडतेवेळी घोषणापत्र सादर केलेले नसेल अशा ग्राहकांद्वारे एफएटीसीए/सीआरएस प्रमाणिकरण.
वेळोवेळी ग्राहकांचे केवायसी/रि-केवायसी अद्ययावत करण्यासाठी आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांतर्गत वरील आवश्यकता आहेत. त्यामुळे सर्व ग्राहकांनी कृपया त्यांच्या संबंधित शाखांमध्ये वरील दस्तावेज सादर करावेत जेणेकरून विनाअडथळा सेवा प्राप्त करण्यासाठी त्यांचे खाते कार्यरत राहू शकेल.
कृपया नोंद घ्यावी की, दि. १५.०३.२०२० रोजी वा तत्पूर्वीपर्यंत वरील दस्तावेज सादर न केल्यास तुमच्याकडून वरील औपचारिकतांच्या अनुपालनापर्यंत खाते गोठवले जाईल.
उत्तम सेवेकरिता तुमच्याकडून त्वरित प्रतिसादाची आम्ही अपेक्षा करीत आहोत.
उप महाव्यवस्थापक
बँकिंग कामकाज विभाग
दिनांक : २०.०२.२०२०

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०००१३.
दूरध्वनी: ०२२-४३२२६८०८/८१२ ईमेल: mlwbwc@gmail.com वेबसाईट: www.mlwb.in
ई-निविदा सूचना
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०००१३ येथील संरक्षक आवार भिंत बांधण्याकरिता नामांकित ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.
अंदाजित खर्च : रु. २७,६०,०००/- जी.एस.टी. सह
अनामत रक्कम : रु. २८,०००/-
निविदेची किंमत : रु. ५,०००/- ना परतावा
उपरोक्त निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येतील. निविदा दि. २०.०२.२०२० ते दि. ०२.०३.२०२० दुपारी ०२.०० वाजेपर्यंत डाउनलोड करता येतील. दि ०३.०३.२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता मध्यवर्ती कार्यालयाच्या वरील पत्त्यावर निविदा उघडण्यात येतील. निविदेची किंमत व अनामत रक्कम https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शनान्वये ऑनलाईन भरावी.
कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ राखून ठेवत आहे.
प्र. कल्याण आयुक्त

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(इन्सॉल्व्हेन्सी अँन्ड बँकरप्टसी ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींची दिवाळखोर ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)
के-लाइफस्टाइल अँन्ड इंडस्ट्रीज लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधून घेण्यासाठी

संलग्न तपशील		
१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	के-लाइफस्टाइल अँन्ड इंडस्ट्रीज लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक	१२.०८.१९८७
३.	प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे	कंपन्या निबंधक,अहमदाबाद, भारत, कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत
४.	कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर :	L74999DN1987PLC000035
५.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास)	नोंदणीकृत कार्यालय : ५८-ए, धानू उद्योग इंड. इस्टेट, पिपेरिया सिल्व्हासा केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली, डीएन ३९६२३० कॉर्पोरेट कार्यालय : कामत इंडस्ट्रियल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
६.	कॉर्पोरेट ऋणकोसंदर्भात ठराव प्रारंभ दिनांक	०५.०२.२०२० (आदेश अपलोड दि. १८.०२.२०२०)
७.	परिसमापन ठराव प्रक्रिया समाप्तीची अंदाजित दिनांक	दि. ०३.०८.२०२०
८.	परिसमापकांचे नाव, पत्ता, ई-मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक व नोंदणीकरण क्रमांक	अजित कुमार नोंदणीकरण क्र .IBBI/IPA-003/IP-N00062/2017-18/10548
९.	बोर्डवर नोंदणीकृत म्हणून इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचा पत्ता व ई-मेल :	नोंदणीकृत पत्ता -१ए, संस्कृत अपार्टमेंट, जीएच २२, सेक्टर ५६, गुरुग्राम, हरयाणा १२२०११ ईमेल आयडी : cmaajitjha@gmail.com
१०.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल	पत्ता - सन रिझोल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड, ८३, नॅशनल मीडिया सेंटर, शंकर चौक, अॅम्बीयन्स मॉल डीएलफ सायबर सिटीजवळ, गुरुग्राम १२२००२.ईमेल आयडी : cirp.klifestyle@gmail.com
११.	दावे सादरीकरणाची अंतिम तारीख	दि. ०३.०३.२०२०
१२.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यांद्वारे निश्चित अनुच्छेद २१ च्या उप-अनुच्छेद (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत धनकोंचा वर्ग काही असल्यास	लागू नाही.
१३.	वर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नियुक्त परिसमापन अधिकाऱ्यांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) -	लागू नाही
१४.	ए) संबंधित फॉर्म व बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील जेथे उपलब्ध आहे	वेबलिंक : www.ibbi.gov.in प्रत्यक्ष पत्ता : लागू नाही

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. ०५.०२.२०२० रोजी (आदेश १८.०२.२०२० रोजी अपलोड)**के-लाइफस्टाइल अँन्ड इंडस्ट्रीज लिमिटेडच्या विरोधात कॉर्पोरेट परिसमापन** प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे.
के-लाइफस्टाइल अँन्ड इंडस्ट्रीज लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी दि. ०३.०३.२०२० रोजी वा तत्पूर्वीपर्यंत बाब क्र. १० अंतर्गत विहित पत्त्यावर परिसमापकांकडे आपल्या दाव्यांचे पुरावे सादर करावेत.
वित्तीय धनकोनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. कार्यरत धनको, कामगार व कर्मचाऱ्यांसमवेत, व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करू शकतील.
वरील विवरण क्र. १२ अंतर्गत सूचिबद्ध वर्गातील वित्तीय धनकोंनी फॉर्म सीएममधील वर्गाच्या अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी विवरण क्र. १३ मध्ये विवरणीत सूचिबद्ध तीन परिसमापन अधिकाऱ्यांतून एकाची निवड करावी.
चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.
अजित कुमार
अंतरिम ठराव अधिकारी
नोंदणीकरण क्र : IBBI/IPA-003/IP-N00062/2017-18/10548
दिनांक : १९.०२.२०२०
ठिकाण : गुरुग्राम